**अनैतिक व्यापारातून सुटका करण्यात आलेल्या पिडित व्यक्तींची मायदेशी रवानगी करण्यासाठी स्थापित कृतीदलाची पुनर्रचना**

महिला व बाल कल्याण आयुक्तालय
म. रा. पुणे - १
क्रमांक- २२३६
दिनांक- 15 MAY 2013
कक्ष क्रमांक-

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.५३/का-०३
नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा माळा,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- ०७ मे, २०१३

**प्रस्तावना:-** चांगले व सुरक्षित जीवन जगणे या मानवाच्या हक्काच्या विरोधात मानवी व्यापार कार्य करीत आहे. यामध्ये शोषणाचा सुध्दा समावेश आहे. व्यापारामध्ये बऱ्याच पिडित व्यक्ती या भितीपूर्ण वातावरणात जगत असतात. तसेच काही व्यक्तींचे त्याच परिस्थितीमध्ये जीवन संपते तर काही कष्टप्रद वातावरणात जीवन कंठत असतात. प्रामुख्याने बालके ही जास्त करून आपादस्थितीत असतात कारण ती विरोध अथवा त्याविरूध्द लढण्यास सक्षम नसतात. बहुतकरून वाहतुकीस बळी पडलेल्या व्यक्तीच्या प्रकरणामध्ये बळीत पिडित व्यक्ती या बंदी, अटकाव या वातावरणात समाजाकडून दुर्लक्षित असते आणि तिला जगण्याच्या उपलब्धततेची संधी कमी असते. मानवी व्यापार करण्यामागे अनेक कारणे असतात त्यामध्ये लैंगिक छळासाठी मानवी व्यापार हे सर्वमान्य कारण आहे. सदयस्थितीत लैंगिक छळासाठी मानवी व्यापारातील पिडित व्यक्तीच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि पुनर्स्थापना यासाठी उपलब्ध असणारी माहिती अत्यंत मर्यादीत आहे.

आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सन २००६-०७ ते २०११-१२ या कालावधीत विविध संस्थांमध्ये सुटका करून दाखल करण्यात आलेल्या पिडित व्यक्तीबाबत संकलीत केलेल्या माहितीनुसार ९७४ (१३%) व्यक्ती या महाराष्ट्रातील आहे आणि ६६२३ (८७%) या बाहेरील राज्य व देशातील आहेत. ३९९ (५%) बांगलादेश, १९१ (३%) नेपाळ मधील आहेत. तसेच पश्चिम बंगाल -२६५१ (३५%), कर्नाटक ६७६ (९%), उत्तर प्रदेश ५०४ (७%) आणि राजस्थान ४७३ (६%) यामधील आहेत. या कारणामुळे राज्य व देशाबाहेरील मानवी वाहतुकीचा विचार होणे आवश्यक आहे. प्रामुख्याने बाहेर देशातील बांगलादेश आणि नेपाळ या देशांचा विचार होणे आवश्यक आहे. महिला व बाल विकास विभागाने शासन निर्णय क्र. रिप-२००८/प्र.क्र.३१/का-३, दिनांक ३ मार्च, २००९ अन्वये कृती दलाची स्थापना केली आहे यामध्ये कृतीदलाचे सदस्यत्व, आदर्श कार्यपध्दती, विविध नमुने यांचा समावेश आहे. मायदेशी रवानगीच्या पध्दतीतील गुंतागुंत विचारात घेता या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध यंत्रणांमध्ये समन्वयाची आवश्यकता आहे आणि याचा विचार करून कृतीदलाच्या रचनेत बदत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय:-**

शासनाचे निर्णय क्र. रिप-२००८/प्र.क्र.३१/का-३, दिनांक ३ मार्च, २००९ अन्वये प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कृतीदलाची खालीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | कृतीदलातील पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | अध्यक्ष |
| २. | मा. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३. | पोलिस आयुक्त, बृहन्मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४. | आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| ५. | उप सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ६. | अप्पर पोलिस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र | सदस्य |
| ७. | महानिरीक्षक, रेल्वे सुरक्षा बल, मध्य रेल्वे | सदस्य |
| ८. | महानिरीक्षक, रेल्वे सुरक्षा बल, पश्चिम रेल्वे | सदस्य |
| ९. | विशेष पोलिस महानिरीक्षक (महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग) | सदस्य |
| १०. | पोलिस उप आयुक्त, मुंबई, FRO Clearance | सदस्य |
| ११. | प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १२. | इंटरनॅशनल जस्टीस मिशन यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १३. | सेव्ह द चिल्ड्रेन (इंडिया), मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ~~१४.~~ | ~~प्रेरणा, मुंबई यांचे प्रतिनिधी~~ | ~~सदस्य~~ |
| १५. | युनिसेफ यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| १६. | अधिक्षक, नवजीवन महिला वसतिगृह संरक्षणगृह / विशेष पुनर्वसन केंद्र | सदस्य |
| १७. | उप आयुक्त (महिला विकास), महिला बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**कृतीदलाची भूमिका:-**

१. राज्य व देशाबाहेरील सुटका करण्यात आलेल्या पिडित व्यक्तींच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरण यासाठी निश्चित केलेली पध्दत सुरळीतपणे सुरू रहाण्यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय निर्माण करणे आणि यासाठी संबंधित विभागांसोबत नियमित बैठका घेणे.

२. राज्य व देशाबाहेरील सुटका करण्यात आलेल्या पिडित व्यक्तींच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरणासाठी संपर्क यंत्रणा म्हणून काम करणे तसेच याबाबत जलदगतीने कार्यवाही होत आहे याची खात्री करणे.

३. आदर्श कार्यपध्दती बाबत संनियंत्रण करून वेळोवेळी आढावा घेऊन आवश्यकता असेल तर सुधारणा करणे.

४. राज्य व देशाबाहेरील सुटका करण्यात आलेल्या पिडित व्यक्तींच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरण यासाठी पुरेसे मनुष्यबळ आणि निधी उपलब्ध होईल याचा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक त्या शिफारशी करणे.

५. इतर राज्य / देशाचे कृतीदल आणि विभाग यांचेसोबत माहितीचे आदान प्रदान करणे (प्रामुख्याने बांगलादेश आणि नेपाळ)

६. राज्य सल्लागार समितीस पिडित व्यक्तींच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरण यासाठी केलेल्या कार्याचा वेळोवेळी अहवाल देणे.

**सदस्य सचिव यांची भूमिका:-**

१. कृतीदलाच्या बैठकीचे नियमितपणे आयोजन करणे.

२. कृतीदलाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणे.

३. इतर राज्याकडून माहिती मिळविणे (प्रामुख्याने बांगलादेश आणि नेपाळ)

४. बांगलादेशी पिडित व्यक्तीच्या मायदेशी रवानगीबाबत कार्यवाही सुरू करणे.

५. संस्था अधिक्षकांना पिडित व्यक्तीच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरण याकरीता आवश्यक मार्गदर्शन व सल्ला देणे.

६. राज्यातील पिडित व्यक्तींच्या सुटका, पुनर्वसन, मायदेशी रवानगी आणि एकात्मिकरणे याबाबत नियमित आढावा घेणे.

**कृतीदलाची बैठक:-**

१. कृतीदलाची बैठक प्रत्येक ६ महिन्यातून एकदा किंवा त्या अगोदर आवश्यकता भासल्यास अत्यंत कमी दिवसांच्य सूचनेनुसार आयोजित करण्यात येईल.

२. कृतीदलाच्या अंतर्गत बैठका सदस्य सचिव हे दर ३ महिन्यांनी आयोजित करतील आणि आवश्यकता भासल्यास सदर बैठकींना संस्थेच्या अधिक्षकांना निमंत्रित करण्यात येईल. तसेच सदर बैठकीचा कार्यवृत्तांत कृतीदल अध्यक्ष यांना नियमितपणे सादर करण्यात येईल.

३. कृतीदलाच्या बैठकीकरीता इतर राज्य व देशांच्या प्रतिनिधींना आवश्यकता भासेल तेव्हा बोलविण्यात येईल.

---

**परिशिष्ठ-**

शासन निर्णय क्रमांक रिप-२००८/प्र.क्र.३१/का-३, दिनांक ३ मार्च, २००९ मध्ये नमूद करण्यात आलेली प्रपत्रे

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रधान सचिव
महाराष्ट्र शासन

प्रती,

१. मा. अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान सचिव, कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. आयुक्त, महिला बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. पोलिस आयुक्त (सर्व)
६. कामगार आयुक्त, मुंबई
७. पोलिस उप आयुक्त, गुन्हे अन्वेषण शाखा (आय), मुंबई, ठाणे, पुणे.
८. पोलिस अधिक्षक (सर्व)
९. बाल कल्याण समिती (सर्व)
१०. विशेष पोलिस महानिरिक्षक (म.अ.प्र.), पुणे
११. विभागीय उप आयुक्त, महिला बाल विकास (सर्व)
१२. जिल्हा महिला बाल विकास अधिकारी (सर्व)
१३. युनिसेफ, मुंबई
१४. प्रेरणा, मुंबई
१५. सेव्ह द चिल्ड्रेन (इंडिया), मुंबई
१६. इंटर नॅशनल जस्टीस मिशन, मुंबई.